श्रीसाईबाबा

# मार्च महिन्याचें शिर्डीवृत्त

मार्च महिन्यांत शिर्डी येथें १०६ संतप्रेमी बांधव श्रीसाईसमाधिदर्शनाकरितां येऊन गेले. ते खालील ठिकाणाहून आले होते. मुंबई, अंधेरी, वांद्रें, सान्ताक्रूझ, कुर्ला, खार, पुणें, खडकी, जळगांव, धुळें नाशिक, ठाणें, पालघर, उतलसर, सुरत, अहमदनगर, खर्डे, मिरतगांव, नेवासें, टाकळीभान, दौंड, राहुरी, खामगांव, भुसावळ, बऱ्हाणपूर, इंदुर, उमरावती, एलीचपूर, नांदगांव, सं. अक्कलकोट, व मळगांव, सं. सावंतवाडी. आलेल्या मंडळींत श्रीमंत सौ. खाशाबाईसाहेब मालेगांवकर, पुण्याचे कोऑपरेटिव्ह सोसायटीचे श्रीयुत के. जी. प्रभु, पुण्याचे प्रोफेसर ग. गो. नरके व पार्शी वगैरे मंडळी होती.

श्रीरामनवमीकरितां दरसालप्रमाणें यात्रा आली होती; परंतु गेल्या सालापेक्षां यंदा ती कमी होती. सुमारें ४००० यात्रा होती. श्रीरामनवमीउत्सवास ता. २३-४-३४ शुक्रवार रोजीं सुरवात होऊन तो ता. २७-४-३४ गोकुलकाला होऊन समाप्त झाला. हा उत्सव ह. भ. प. दासगणूमहाराज साजरा करितात. त्यांना उत्सवांत मदत करण्याकरितां त्यांची नांदेडची ५०-६० मंडळी दरवर्षाप्रमाणें आली होती. उत्सवांत दासगणू महाराज यांनीं कीर्तनें केलीं. रामनवमीस लागून रविवार व सोमवार हे दान सुटीचे दिवस असल्यामुळ व रेल्वे कंपनीनें जाण्यायेण्याचें तिकिट दीडपट दरानें दिलें त्यामुळें पाहुणेमंडळी बरीच आली होती. त्यांच्या राहण्याची गैरसोय, श्री. बाळासाहेब देव संस्थानचे एक विश्वस्त, यांच्या सूचनेवरून दीक्षीत. वाड्यांतील मागील पटांगणांतील पडव्यांच्या खोल्यांत रूपांतर करून घेऊन कांहीं अंशीं दूर केली. तरी पाहुणेमंडळीची उत्सवाच्या वेळीं राहण्याच्या जागेची सोय अजून पूर्ण झाली नाहीं. श्रीयुत नागेश आत्माराम सावंत यांनीं रु. ५०० व डॉ. केशरीनाथ वासुदेवराव सावे यांनीं रु. १००० शिर्डी येथें घर बांधण्याकरितां कांहीं अटींवर देण्याचें केलें आहे. त्याबद्दल संस्थान-

कमिटीनें असा ठराव केला कीं, देऊं केलेल्या रकमेंत कशीं घरें बांधावयाचीं याचा अंदाज पहिल्यानें करावा व नंतर तीं कोणत्या जागेंत बांधावयाचीं ह्याबद्दलचा विचार पुढील सभेंत करावा व त्याप्रमाणें देणगी देणारांस कळवून त्यानंतर कामास सुरवात करावी. मध्यंतरीं कोणीं घरें बांधण्याकरितां रकमा दिल्या, तर ह्या कामाचा निकाल लवकरच लागेल. घरें दोन खोल्या व पुढें ओटा व मागें लहान ओटा ह्या धर्तीवर चाळीप्रमाणें बांधण्यास कमी खर्च लागेल. संस्थानकमिटी आतां खोल्या बांधण्याचें काम नेटानें तडीस नेईल असें वाटतें.

श्रीसमाधिमंदिरासमोरील पटांगणावर शोभेचा सभामंडप बांधण्याच्या कामास जास्त रक्कम पाहिजे व ती अजून ह. भ. प. दासगणूमहाराज यांजकडून जमली नाहीं; म्हणून तूर्त संस्थानकमिटीनें एक पत्र्याचें छपर त्या पटांगणावर उभें करावें असें ठरविलें आहे, व त्याकरितां रु. १००० ची रक्कम मंजूर केली आहे.

पुण्याचे भजनरत्न बाळकृष्ण गोविंद पंडित यांनीं उत्सवांत श्रींच्या समाधीपुढें त्यांच्या मंजुळ गायनानें मंडळीचें मनोरंजन करून श्रींची सेवा केली.

मुंबई येथील विद्यारामभाईच्या राममंदिरांतील शंकरराव वाळकुटकर यांनीं उत्सवांत दोन दिवस श्रींच्यापुढें आपलें मृदंग वाजविण्याचें कलेचें ज्ञान दाखविलें.

ता. २-३-३४ रोजीं श्रीतुकाराम महाराज यांची बीज यानिमित्त संस्थानचे गवई श्रीयुत शिरोळकर यांचें कीर्तन झालें व श्रीयुत बा. वि. देव व श्रीयुत दीक्षीत मिळून अडीच पायलीच्या खिचडीचा नैवेद्य केला.

ता. ९-३-३४ रोजीं रंगपंचमीनिमित्त श्रींस अभिषेक केला व रथाची मिरवणूक काढली.

ता. २३-३-३४ रोजीं दासगणूमहाराज यांनीं श्रीयुत बापूराव रा. बोराबके यांचे चि. दिगंबर यांच्या नवसाबद्दल महाराजांच्या मंदिरांत भारोभार साखर वांटली.

श्रीयुत दादाजी गोपिनाथ जोशी, मुंबई, यांनीं त्यांचा चि. नथुराम याची गुळाची तुला करून तो गुळ वांटला व श्रींच्या पालखीपुढें लावण्याकरितां शोभेची दारू दिली.

रामनवमीउत्सव संपल्यानंतरही दासगणूमहाराज संध्याकाळीं एखादें कीर्तन करीत असत. एका कीर्तनांत त्यांनीं शिर्डी संस्थानकमिटीच्या सभासदांस कळविलें कीं, डॉक्टरच्या सूचनेवरून त्यांनीं उघडया अंगानें ह्यापुढें कीर्तन करूं नये. कीर्तन करावयाचें असल्यास अंगांत गरम बंडी घालून करावें, नाहीं तर घामामुळें प्रकृतीस बाध होईल. म्हणून त्यांनीं संस्थानकमिटीच्या हजर असलेल्या सभासदांस विनंती केली कीं, श्रीसाईबाबांनीं कपडे घालून कीर्तन करण्यास मी जात असतांना ते कपडे काढावयास लावून कीर्तन बिनकपडयानें करावयास सांगितलें व त्याप्रमाणें आजपर्यंत मी अंगांत कपडा घातल्याशिवाय कीर्तन करीत आलों आहें. परंतु डॉक्टरच्या सल्ल्यावरून उघडया अंगानें ह्यापुढें कीर्तन करणें प्रकृतीस बाधक होईल. जसें श्रीसाईबाबांनीं कपडे काढून घेतले व ते त्यांच्यापुढें ठेवले, तसे कपडे त्यांच्याचकडून आले पाहिजेत;म्हणून श्रीसाईबाबांच्या अंगावरील एखादी शालीची बंडी कमिटीनें करून दिली, तर ती कीर्तन करितांना मी मात्र घालीन, नाहीं तर मी उघडयानेंच आजपर्यंत कीर्तन जसें साईबाबांच्या आज्ञेवरून करीत आलों आहें त्याप्रमाणेंच करीत जाईन.

संस्थानकमिटीनें त्याप्रमाणें त्यांस हिरव्या शालीच्या दोन बंडया करुन दिल्या. कीर्तनकाराची मूळ गादी नारदाकडून आली आहे, व नारदमुनि अंगांत कपडे घालीत नव्हते. शिर्डी येथें दासगणूमहाराज नेहमींप्रमाणें कपडे घालून कीर्तन करावयाच्या आधीं साईबाबांच्या दर्शनास आले, तेव्हां साईबाबा यांनीं त्यांस विचारलें कीं, "नवरदेवासारखा कपडे घालून थाटून कोठें चाललास ?" दासगणूमहाराज यांनीं उत्तर दिलें कीं, "कीर्तन करण्यास." तेव्हां श्रीसाईबाबांनीं दासगणू महाराजांस स्वतःसमोर कपडे काढावयास लावूनां सांगितलें कीं, "कीर्तन कपडे घालून करूं नये." ह्या उघडया अंगानें कीर्तन

करण्याबद्दलची सविस्तर माहिती श्रीसाईभक्त दाभोळकरकृत श्रीसाईसच्चरित अध्याय १५ वा ओव्या १९ ते ३१ ह्या प्रासादिकग्रंथांत आली आहे. ती खालीं दाभोळकरांच्या प्रेमळ वाणींतच देतों.

" पडलिया शिष्टांचा आग्रह । गणूदास करिती कथानुग्रह ॥
एका कवडीचाही परिग्रह । किंवा दुराग्रह तेथें ना ॥ १९ ॥

कीर्तना न लगे देणें कवडी । तनु उघडी डोई न पगडी ॥
कासेसी साधीच पंचेजोडी । अनिवार उडी श्रोत्यांची ॥ २० ॥

या पोषाखाची ही कथा । मौज वाटेल श्रवण करितां ॥
अवधारा ती स्वस्थ चित्ता । पहा आश्चर्यता बाबांची ॥ २१ ॥

एकदा गणूदासांची कथा । शिरडीग्रामीं होणें असतां ॥
अंगरखा उपरणें फेटा माथां । पोषाख समन्विता निघाले ॥ २२ ॥

शिष्टाचारानुसारता । आनंदें बाबास वंदूं जातां ॥
"वाहवा नवरदेव कीं सजलासि आतां" । बाबा वदतां देखिलें ॥२३॥

"जातोस कोठें ऐसा सजुनी" । बाबा पुसती तयांलागुनी ॥
"कीर्तन कराया जातों" म्हणुनी । दासगणूंनीं कथियेलें ॥२४॥

पुढें बाबा वदती तयांस । "अंगरखा उपरणें फेटा कशास ॥
किमर्थ केलास इतुका प्रयास । न लगती आपुलयास कांहीं ॥२५॥

'काढ कीं तीं मजसमोर । कशास अंगावर यांचा भार' ॥
तंव तीं तयांच्या अनुज्ञेनुसार । तेथेंच चरणांवर ठेवलीं ॥२६॥

तैंपासून उघडे सोज्वळ । हातीं चिपळी गळां माळ ॥
कीर्तनसमयीं सर्व काळ । गणूदास हा वेळपर्यंत ॥२७॥

तऱ्हा ही जरी जनविरुद्ध । तरी ती अत्यंत पायाशुद्ध ॥
कीं जो प्रबुद्धांचा प्रबुद्ध । नारदप्रसिद्ध हा मार्ग ॥२८॥

हीं नारदीय मूळ गादी । येथूनचि हरिदासांची मांदी ॥
बाह्यरंगाची न ज्यां उपाधि । अंतःशुद्धि ध्येय ज्यां ॥२९॥

अधोभागचि वस्त्राच्छादित । चिपळ्या वीणा वाजवीत ॥
मुखीं हरिनाम गर्जत । ध्यान विश्रुत नारदाचें ॥३०॥

साईसमर्थांचे कृपेनें । स्वयें रचूनि संतांचीं आख्यानें ॥
मोलावीण करिती कीर्तनें । ख्याति तेणें पावले ॥३१॥

दादर मुंबई येथील श्रीयुत दादाजी गोपीनाथ जोशी व ठाण्याचे वकील श्रीयुत गोपाळ भास्कर दातार यांनीं श्रीस लघुरुद्र केले. सौ. जानकीबाई बा. देव यांनीं सोळा सोमवारांचें उद्यापन केलें, त्याबद्दल १५० पान ब्राह्मण व इतर मंडळी मिळून घातलें. त्यांच्या सुनेच्या डोहाळेप्रीत्यर्थ लेंडीबागेंत चहा-चिवड्याचा समारंभ केला.

ता. ३०-४-३४ रोजीं संगमनेर येथील शास्त्री वासुदेव राजाराम नेसाळ सिन्नरकर यांनीं श्रीपुढें भक्ति विषयावर प्रवचन केलें. त्याशिवाय श्रीयुत बाळासाहेब देव यांचें रोज ज्ञानेश्वरीवर प्रवचन होत असे. उत्सवांत व त्यानंतर आलेल्या भक्तमंडळीचे श्रींस अभिषेक झाले.

## जिनसा वगैरे आल्या त्यांचा तपशील

१ दोन आरसे किं.रु. १|. श्रीयुत माधवराव विठुजी सातपुते—हरदा
२ चांदीचे डोळे; श्रीयुत रा. बा. पाटणकर—नाशिक
३ साधें उपरणें; ,, सुरेंद्रनाथ आ. तर्खड—खडकी
४ चंदनाचें खोड; ,, गोपाळ भास्कर दातार—ठाणें
५ इमिटेशन रेशमी जरीकांठी उपरणें; श्रीमती विमलाबाई फणसळकर, —देवास
६ साधें उपरणें—श्रीयुत कोंडाजी सुतार—शिर्डी
७ गलेफ रेशमी भगवा— श्री. कृष्णाजी गणपत वणकर, शिर्डी

८ चांदीचें तबक, कुंकवाची डबी व लामणदिवा, मिळून वजन २९ भार चांदी. किं. रु. २५.—श्रीयुत दादाजी गोपिनाथ जोशी, दादर मुंबई, यांनीं त्यांचा चि. नथुराम याच्या आरोग्यप्रीत्यर्थ श्रींस अर्पण केलें.

९ एक पेट्रोमॅक्सकंदिल किं.१३–६–० व एक रेशमी साडी किं. रु. ६, टॉवेल नग ३ किं. १–१४–०, मिसेस रतनबाई आदरजी श्रॉफ—बाळाराम स्ट्रीट-पेटीट चाळ, मुंबई यांनीं श्रींस अर्पण केलें.

१० रेशमी सफेद चादर किं. रु. ४; मिसेस दोशीबाई धनजीशा, मुंबई

११ रेशमी जरीकांठी गलेफ किं. रु. १०–५; श्रीयुत वसंतराव गणपतराव कीर्तिकर चि. नंदकुमार याच्या मौंजीप्रीत्यर्थ

१२ गलेफ रेशमी पिवळा; रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान

१३ नागपुरी रेशमी उपरणें, श्रीयुत बापाजी बळवंत देशपांडे

१४ एक हिरवा व एक तांबडा रेशमी पीतांबर; सौ. जानकीबाई बाळकृष्ण देव यांनीं सोमवार उद्यापनाप्रीत्यर्थ श्रींस अर्पण केले.

१५ इमिटेशन रेशमी कापड गलेफाकरितां;श्रीयुत बापू आप्पा डांगे-कोल्हाळे हस्तें-भिकुबाई कोष्टीण.

शिर्डी संस्थान कमिटीची सभा शिर्डी येथें ता. २३, २४ व २५ एप्रिल रोजीं भरली होती.

## चुकीची दुरुस्ती

जानेवारीच्या शिर्डीवृत्तसदराखालीं रावबहादुर स. ब. धुमाळ यांजकडून लेंडीबागेंत केळी लावण्याकरितां पांच रुपये देणगी आली, ती चुकीनें पुन्हा छापली गेली आहे. ती डिसेंबरच्या शिर्डीवृत्तांत येऊन गेली आहे.

साईभुवन,
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट मुंबई २
ता. ११–४–१९३४

**सुंदरराव दि. नवलकर**
ऑ. चिटणीस,
शिर्डी संस्थानकमिटी

# एप्रिल महिन्याचें शिर्डीवृत्त

शिर्डी येथें एप्रिल महिन्यांत मुंबई, पुणें, नाशिक, सोलापूर, ठाणें, अहमदनगर, अश्वी, खानदेश, शिरपुर, शिरसोले, नांदगांव, वऱ्हाड, बुलढाणा वगैरे ठिकाणांहून संतप्रेमी भक्तमंडळी श्रीसाईसमाधिदर्शनाकरितां आली होती. त्यांत नगरचे रावबहाद्दुर नवले, पुण्याचे कन्सल्टिंग इंजीनियर श्रीयुत व्यंकटेश गोपाळ शेटये वगैरे मंडळी होती. कांहीं भक्तांनीं श्रींस अभिषेक केला. श्रीयुत बाबासाहेब देव—संस्थानचे एक विश्वस्त यांनीं चांदण्या रात्रींत त्यांची सून सौ. उमाबाई श्रीनिवास देव यांच्या डोहळेजेवणाबद्दल ७५ सुवासिनी जेऊं घातल्या. खार—मुंबई येथील सॉलिसिटर श्री. दिवेचिया यांनीं श्रींस अभिषेक केला.

## देणगी, जिनसा वगैरे आल्या त्यांचा तपशील

१ पितळी झाड फुलांचा गुच्छ ठेवण्याकरितां. श्री. आ. ला. आरोळकर, गुंटकल

२ एक तांदळांची गोण—पक्क्या १४ पायली—श्रीयुत बाळाजी गोविंद रासणे, अहमदनगर

३ दोन तांदळांच्या गोणी पक्क्या २८ पायली—श्रीयुत दामोदर सावळाराम रासने, अहमदनगर

४ चांदीचे डोळे, खरें मोतीं बारीक ५—श्रीयुत छबू दिवटे, शाळामास्तर—शिर्डी

५ आंबराईखात्यांत लेंडीबाग देणगी र. ५—श्रीयुत बाळकृष्ण वि. देव

६ सुती पिवळेंकाठी उपरणें--श्रीयुत गोविंद धोंडु पानसरे अ. मास्तर, सोलापूर

दासगणूमहाराज नांदेडास गेले. हल्लीं वस्ती तेथें आहे. रावबहादुर सखाराम बळवंत धुमाळ संस्थानचे एक विश्वस्त यांची प्रकृति बरी नसल्यामुळें त्यांना श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां शिर्डीस येतां आलें नाहीं. श्रीसाईकृपेनें त्यांच्या प्रकृतीस आतां आराम आहे. शिर्डी संस्थानकमिटीची--पोट कमिटीची सभा सान्ताक्रूझ येथें रावबहादुर प्रधान यांच्या बंगल्यांत ता. २९।४।३४ रोजीं भरली होती.

साईभुवन,<br>
१४१ प्रिन्सेस स्ट्रीट,<br>
मुंबई, ता. ७ मे १९३४

**सुंदरराव दि. नवलकर,**<br>
ऑ. चिटणीस, शिर्डी संस्थानकमिटी

॥ श्री ॥

# निंबवृक्षाखालीं स्थापन केलेल्या बाबांच्या पादुकांची मूळ हकीकत.

## लेखांक १

श्रीयुत श्रीसाईलीला संपादकमहाशय यांस, सप्रेम कृ. शि. सा. न. वि. वि.

श्रीयुत रा. रा. सुंदरराव दीनानाथ नवलकर, शिर्डीसंस्थान सेक्रेटरी यांनीं ता. १५-२-३४ रोजीं लिहिलेल्या पत्राप्रमाणें श्री. सगुण मेरु नाइक व श्री. गोविंद कमलाकर दीक्षित, वास्तव्य शिर्डी यांच्याजवळ समक्ष चवकशी करून श्री. साठेसाहेब ( हल्लीं श्री. ॲडव्होकेट नवलकरसाहेब ) यांच्या वाडयांत श्री. निंबवृक्षातलीं बसविलेल्या बाबांच्या पादुकांबद्दल, त्यांनीं सांगितलेली हकीकत जशीच्या तशी आपल्याकडे प्रसिद्धीकरतां पाठवीत आहें. ती आपल्या विबुधमान्य श्रीसाईलीलेच्या एखाद्या अंकांत कृपेनें प्रसिद्ध करावी.

शके १८३४ सालची गोष्ट. श्रीसमर्थ सद्गुरुसाईबाबांच्या दर्शनास त्या वेळीं मुंबईचे डॉक्टर श्री. रामराव कोठारे येत असत. तसेंच त्यांचे औषधयोगविद् ( कंपाऊंडर ) व त्यांचे ( औषधयोगविद् ) स्नेही श्री. भाई कृष्णाजी अलीबागकर हेही बाबांच्या दर्शनास येत असत. हे औषधयोगविद् व भाई आमच्याच मंडळींत बसत असत. आमचा व त्यांचा स्नेह जमला. बाबा शिरडींत प्रथम आले व त्या वेळीं साठेसाहेबांच्या वाडयांत ज्या पुण्य व पवित्र निंबवृक्षाखालीं बसले, तेथें त्यांची कांहीं तरी खूण असावी, असें आमच्या सर्वांच्याच मनांत आलें. बाबांच्या पादुका तेथें बसवाव्या असें ठरलें, व त्याप्रमाणें आम्ही बाबांच्या साध्या दगडी ओबडधोबड पादुका तयारही करून आणिल्या. तेव्हां भाईचे स्नेही कंपाउंडर म्हणाले कीं, तुम्ही ज्या ह्या असल्या पादुका बसविणार, त्यापेक्षां जर ही गोष्ट आमच्या मालकांस

कळेल तर ते तुम्ही बसविणार यापेक्षां किती तरी उत्तम पादुका तयार करून बसवितील. तरी तुमची सर्वांची संमति असल्यास मी त्यांना ही गोष्ट कळवितों. आम्हीं सर्वांनीं या गोष्टीस मान्यता दिली. त्यांनीं ही हकीकत डॉक्टरसाहेबांना कळविली. नंतर रामराव येथें समक्ष आले, व त्यांनीं संगमरवरी पादुकांचा एक नकाशा तयार केला. रामराम श्रीउपासनी-कडेही जात असत. त्याप्रमाणें त्या वेळीं ते त्यांच्या भेटीसाठीं श्री-खंडेश्वराच्या मंदिरांत गेले व त्यांनीं त्यांना तो नकाशा दाखविला. आम्हीही त्यांच्याबरोबर होतों. उपासनी रामरावांना म्हणाले कीं, "तुम्ही करतां तें सर्व ठीक आहे. परंतु नुसत्या पादुका तयार न करतां मी सांगतों त्याप्रमाणें त्यावर कमळें, वेलपत्ती, शंख चक्र, गदा, पद्म वगैरे आकृत्या काढून चारी बाजूनें त्यास संगमरवरी दगडाचे पाट लावावे. पादुकांची बैठक उच्चास-नावर असावी. नुसत्या जमीनीवर नसावी व पुढच्या पाटावर निंबवृक्षाची महति व बाबां ँ योगैश्वर्यदर्शन गीर्वाण भाषेंत श्लोक लिहावा." डॉक्टर कोठारे यांनीं उपासनींची ही गोष्ट मान्य केली व त्याप्रमाणें पादुका मुंबईस तयार करून घेऊन कंपाउंडरबरोबर इकडे पाठवून दिल्या. कंपा-उंडर यांनीं त्या प्रथम श्रीखंडोबाच्या मंदिरांतच ठेविल्या. तेथें त्या दोन दिवस होत्या. त्यांची स्थापना निंबवृक्षाखालीं केव्हां करावी याबद्दल कंपाउंडर यांनीं बाबांची अनुज्ञा मागितली. श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं त्या पादुका निंबवृक्षाखालीं स्थापन करा, असें बाबा म्हणाले. त्याप्रमाणें त्या दिवशीं श्री. गोविंद कमलाकर दीक्षित यांनीं त्या पादुका सकाळीं ११ वाजतां मस्तका-वर घेऊन खंडोबाच्या मंदिरापासून श्रीद्वारकामाईपर्यंत त्यांची मोठी मिरवणूक काढून द्वारकामाईंत बाबांच्या चरणाजवळ आणून ठेविल्या. हे देवाचे पाय आहेत, असें सांगून बाबांनीं त्यांना हस्तस्पर्श केला, व वाड्यांत निंबाच्या झाडाखालीं बसवा असें म्हणाले.

भक्तश्रेष्ठ पास्ताशेट पारशी, मुंबईकर यांनीं बाबांना दक्षिणा देण्या-करतां २५ रुपयांची मनिआर्डर भाईंचे नांवावर केली. ती भाईंना ह्या

पादुका बसविण्याच्या अदल्या दिवशीं मिळाली. भाईंनीं ती बाबांना लागलीच दिली. उद्यां आपल्यास खर्चास होईल असें म्हणून ती २५ रुपयांची रक्कम बाबांनीं भाईजवळ परत दिली. पास्ताशेट व डॉक्टर कोठारे यांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. पण पास्ताशेट हे भाईंचे स्नेही. पादुका स्थापन करण्याकरितां डॉक्टरसाहेबांनीं कांहींएक रक्कम पाठविली नाहीं. त्यांनीं फक्त पादुका तयार करून पाठविल्या इतकेंच. पादुकांची स्थापना करण्यास श्रीउपासनी, कै. बापूसाहेब जोग, कै. बाळासाहेब भाटे, मामलतदार, कै. दादा केळकर वगैरे मंडळी हजर होती. पादुकांच्या प्राणप्रतिष्ठेनिमित्त भोजनखर्च व इतर खर्च मिळून सुमारें १०० रुपये खर्च आला. पैकीं बाबांनीं २५ रु. दिले. व ७५ रु. श्री. भाई कृष्णाजी, श्री. वासुदेव आपाजी, साठे, व गोविंद कमलाकर दीक्षित या मंडळींनीं खर्च केले. तेव्हांपासून त्या पादुकांची पूजाअर्चा श्री. दीक्षित ( गोविंद कमलाकर) हे माधुकरी मागून सतत ५ वर्षें करीत. या पांच वर्षांत डॉक्टर कोठारे यांनीं दिवाबत्तीकरितां दरमहा दोन रुपयेप्रमाणें रक्कम भाईंच्या नांवावर पाठविली. त्यानंतर कोठारे यांच्याकडून आजतागायत कोणत्याही कामाकरितां कांहीं रक्कम आली नाहीं. पादुकांच्या भोवतालचा लोखंडी गजांचा लाकडी कठडा डॉक्टर कोठारे यांनीं पाठविला. पण त्याचा रेल्वेखर्च व स्टेशनपासून येथपर्यंत आणण्यास झालेला खर्च रु. ७-८ श्री. सगुण मेरु नाईक यांनीं केला. तसेंच, त्यावर पत्रे घालण्याचा खर्चही सगुणरावांनींच केला गोविंदराव दीक्षितांनीं पूजा करावयाची सोडल्यापासून श्री. लक्ष्मण कचेश्वर जाखडी ऊर्फ नानू पुजारी हे त्या पादुकांची पूजा करतात, व रोजचा नैवेद्य सगुणराव आणतात, व सायंकाळचा दिवाही तेच लावतात.

भाई कृष्णाजी हे मूळचे श्रीसमर्थ सद्गुरु अक्कलकोट स्वामिमहाराजांचे भक्त. भाई हे त्या वेळीं म्हणजे शके १८३४ सालीं म्हणजे निंबवृक्षाखालीं बाबांच्या पादुका स्थापन करण्याचा विषय निघाला त्या वेळीं अक्कलकोटास जाण्याकरितां येथें आले होते. बाबांचें दर्शन घेऊन अक्कल-

कोटास जाण्याचा त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें त्यांनीं बाबांचें दर्शन घेतलें व मी अक्कलकोटास जातों असें ते बाबांना म्हणाले. बाबा म्हणाले, "अरे, अक्कलकोटास काय आहे ? तेथें कशाला जातोस, तेथलाच मी येथें आहें." हें ऐकतांच भाई अक्कलकोटास गेले नाहींत. ते एक वर्ष असेच इकडे येत असत, व नंतर पादुकांची स्थापना झाली.

पादुकांच्या पुढच्या उभ्या संगमरवरी पाटावर श्रीउपासनींनीं करून दिलेला श्लोक खालीं लिहिल्याप्रमाणें खोदला आहे.

## भुजंगप्रयातवृत्तम्

"सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात् ।
सुधास्त्राविणं तिक्तमप्यप्रियं तम् ।
तरुं कल्पवृक्षाधिकं साधयंतम् ।
नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम् ॥"

श्रीसाइसच्चरित अध्याय पांच यांत या पादुका प्रतिष्ठापनेची जी हकीकत दिली आहे, ती वरील हकीकतीशीं विसंगत किंवा गैरसमजाची आहे असें नाहीं. परंतु ती सविस्तर नाहीं. शिवाय भाईंनीं अक्कलकोटास जाण्याची तयारी केली, त्याच्या आदल्या दिवशीं भाईंना स्वप्न पडलें कीं, 'सांप्रत मी शिर्डीस आहें तेथें तूं जा.' म्हणून भाई अक्कलकोटास न जातां शिर्डीस आले. ही हकीकत श्री. गोविंदराव दीक्षित किंवा सगुणराव सांगत नाहींत. तसेंच डॉक्टर रामराव कोठारे यांची हकीकत व त्यांचा पादुकाशीं संबंध कै. अण्णासाहेब दाभोळकर श्रीसाईसच्चरितकर्ते यांना कळला नाहीं, असें दिसतें. त्यांना तो जर कळता, तर डॉक्टरसाहेबांनीं या कामीं अंतःकरण-पूर्वक श्रद्धेनें, प्रेमानें, उदारबुद्धीनें व बाबांवरील नितांत निष्ठेनें केलेल्या या मदतीचा आभार व गौरवपूर्वक उल्लेख आपल्या श्रीसाईसच्चरिताच्या पांचव्या अध्यायांतील पादुकांच्या प्रतिष्ठापनवृत्ताबरोबर करण्यास खात्रीनें कधींही विसरले नसते.

असो; आतां डॉक्टर रामराम कोठारे हे कालवश झाले, याबद्दल वाईट वाटतें. त्यांच्या सद्गुणी, पतिप्रेमी व निष्ठावंत कुटुंबास सद्गुरु बाबांच्या कृपाप्रसादानें मोठी मिळकत मिळाल्याचें समजतें; तरी त्यांच्या भाविक व श्रद्धाळू यजमानांनीं निंबवृक्षाच्या आश्रयानें वर चढणाऱ्या बाबांच्या पादुका-रूपि अमृतवल्लीचें जें चिमुकलेंसें रोपटें लाविलें आहे, व निराश्रयामुळें व निष्काळजीमुळें जें हल्लीं सुकून व वठून जात आहे, त्याच्या मुळाचें नित्य सिंचन होऊन त्यास जोमानें फोफावण्यास पुरेसा अवसर मिळेल, अशा प्रकारची उदार व त्यांच्या नांवास शोभेशी कायमची देणगी देऊन त्या मोक्षवेलीस जिवंत ठेवल्याचें श्रेय संपादन करावें अशी त्यांचेजवळ नम्र विनंती करून आपली रजा घेतों.

ज्या अंकांत ही हकीकत छापली जाईल, त्या अंकाची एक प्रत डॅक्टरसाहेबांच्या कुटुंबाकडे संस्थानसेक्रेटरी मार्फत आपल्यास योग्य वाट. ल्यास जरूर पाठवावी.

श्रीक्षेत्र शिरडी,<br>
गुरुवार, ता. ५–४–३४ }

**बाबांचें बाळ**

॥ श्रीसाईबाबा ॥

शके १८५६ ते १८५८ पर्यंत शिर्डीसंस्थान कमिटीच्या

# त्रैवार्षिक निवडणुकीकरितां

## श्री साईबाबा शिर्डीसंस्थानच्या भक्तमंडळाच्या सभासदांची यादी

शके १८५५.

### आश्रयदाते

१ शेट महमद व आमद
२ ,, मुसा हाजीअली खत्री
३ श्रीयुत विठ्ठलदास माधवजी ठक्कर
४ ,, श्रीराम सदाशिव तांबे
५ ,, त्रिभुवन जमनदास
६ ,, मगनलाल नथुराम दवे
७ ,, मोतीलाल माणिकचंद ऊर्फ प्रतापशेट
८ ,, व्यंकटेश बळवंत पेंढारकर
९ *श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटी
१० ,, पुर्णचंद्र गोपाळराव बुटी

### सन्मान्य सभासद

१ *ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणूमहाराज ३
२ *श्रीयुत माधवराव बळवंत देशपांडे ८

### तहाहयात सभासद

१ श्री. पार्वतीबाई ओझरकर
२ रा. रा. त्रिंबक आनंदराव कर्णिक
३ ,, शंकर सिताराम कर्णिक
४ ,, हरी केशव कर्णिक
५ ,, केशव महादेव करंदीकर
६ ,, रामकृष्ण जनार्दन करंदीकर
७ श्री. दुर्गाबाई कातुतकर
८ ,, रमाबाई कामत
९ रा.रा. जिवनराव बाळकृष्ण कोठारी
१० प्रेसिडेन्ट कुर्ला अमेच्च्युअर नाटक क्लब
११ रा. रा. आनंदजी हीरजी कुंभार
१२ * ,, यशवंत जनार्दन गाळणकर १
१३ श्री. जानकीबाई सखाराम घटे
१४ रा. रा. मुंदरजी चनाप्पा
१५ डॉ. क्या. बी. आर. चांदोरकर
१६ ट्रू. रा. रा. वासुदेव नारायण चांदोरकर २
१७ शेट जमनादास हरकचंद
१८ माधवजी झीणा ठक्कर
१९ *रा.रा. रामचंद्र आत्माराम तर्खड ६
२० ,, श्रीनिवास बाळकृष्ण देव
२१ ,, श्रीपाद बाळकृष्ण देव
२२ सौ. उमाबाई श्रीपाद देव
२३ ,, कमलाबाई श्रीनिवास देव
२४ सौ. जानकीबाई बाळकृष्ण देव
२५ ट्रू. रा.रा. बाळकृष्ण विश्वनाथ देव ९
२६ ट्रू. रा.ब.सखाराम बळवंत धुमाळ २
२७ प्रोफेसर गणपतराव जी. नारके

२८ *रा. रा. सुंदरराव दिनानाथ नवलकर ८
२९ ,, विष्णु बाळकृष्ण परांजपे
३० जाव अंतोन परेरा
३१ ,, गजानन शिवराम पाटणकर
३२ ,, रामचंद्र वामन पाटणकर
३३ ,, त्रिंबक गोविंद पाटील
३४* ,, रघुवीर भास्कर पुरंदरे ५
३५ ट्र. रा. ब. मोरेश्वरविश्वनाथ प्रधान ९
३६ रा. रा. दामोदर रामकृष्ण बापट
३७ शेट कृष्णलाल मनोरदास
३८ रा. रा. लक्ष्मण गणेश महाजनी
३९ ,, जयशंकर हरजिवन मेथा
४० ,, रजबअली महंमद
४१ ,, लाला लखमीचंद
४२ ,, आनंदराव गणपतराव शितोळे
४३ ,, निळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे
४४ डॉ. केशरीनाथ वासुदेव सावे
४५ रा. रा. मोरेश्वर नारायण सावे
४६ मि. जेक निकोलाव सोज
४७ ,, दाजी विठ्ठल सांबारे
४८ शेट हरेराम धरमसी
४९ डॉ. क्या. व्ही. जी. हाटे

## सामान्य सभासद

१ रा. रा. जी. जी. श्रीयान
२ शेट अरदेशर नामदार इराणी
३ रा. रा. वासुदेव बापूजी अकूत
४ श्री. यमुनाबाई अघोर
५ शेट त्रिभुवन नरोत्तम अढीया
६ रा. रा. व्यंकटचेल्यन अय्यार
७ रा. रा. पुरुषोत्तम रघुनाथ अवस्ती
८ शेट एन. सय्यद अहमद
९ रा. रा. धोंडो महादेव आगरकर
१० श्री. वेणूताई आगाशे
११ रा. रा. केशव गणेश आजरेकर
१२ कु. विमला हरीश्चंद्र आम्रे
१३ रा. रा. आत्माराम लाडोबा आरोळकर
१४ ,, बळवंत हरी कर्णिक
१५ ,, बाळकृष्ण हरी कर्णिक
१६ शेट भिकाजी मेखानजी करंजा
१७ रा. रा. गणेश विठ्ठल करंदीकर
१८ ,, नारायण गोविंद काजळे
१९ ,, वा. गो. कानीटकर
२० श्री. रमाबाई कामत
२१ रा. रा. पी. काशिनाथ
२२ डॉ. हीरालाल आर. क्लार्क
२४ ,, कांतीलाल त्रिभुवनदास क्लार्क
२४ रा. रा. गणपतराव आत्माराम किर्तीकर
२५ ,, वसंतराव गणपतराव किर्तीकर
२६ रा. रा. वामन सांबा केसरकर
२७ रा. ब. गजानन रामचंद्र कोठारे
२८ रा. रा. व्यंकट लिंबाजी कोडळ
२९ ट्र. तात्या गणपत पाटील कोते ८
३० ,, रामचंद्र दादा पाटील कोते
३१ ,, श्रीपादराव शांतमूर्तराव कैकिणी
३२ ,, शामराव भास्कर कंटक
३३ ,, श्रीधर नारायण खारकर
३४ ,, ना. रा. खेडकर
३५‡ ,, गोविंद काशिनाथ गाडगीळ
३६ सौ. लक्ष्मीबाई गोविंद गाडगीळ
३७ रा. रा. दत्तात्रय रामचंद्र गोखले

( पृष्ठ ३२ खालील टीप पाहणें )

३८ रा. रा. लक्ष्मण रघुनाथ गोखले
३९ कु. ताराबाई नारायण गोरक्षकर
४०* रा. रा. वसंतराव नारायण गोरक्षकर ३
४१ सौ. सुशिलाबाई वसंतराव गोरक्षकर
४२ ,, गोपिकाबाई अ. चित्रे
४१ रा. रा. त्रिंबकराव बळवंत चित्रे
४४ ,, पेंडू चोडप्पा
४५ ,, शिवराम निळकंठ चौबळ
४६ सौ. सावित्रीबाई जठार
४७ रा. रा. शामराव रामचंद्र जयकर
४८ ,, दत्तात्रय आत्माराम जाखी
४९ ,, मा. आ. जोशी
५० ,, यशवंत गोपाळ जोशी
५१ ,, आनंदराव पुरुषोत्तम डोळस
५२ कु. नलिनी तर्खड
५३ सौ. अनाबाई मोतीराम तळपदे
५४ ,, कृष्णाबाई विनायकराव तालचेलकर
५५ रा. रा. निलकंठ सखाराम त्रिलोक्य
५६ ,, गोपाळ भास्कर दातार
५७ सौ. सुशीलाबाई गोपाळ दातार
५८ रा. रा. महादेव विठ्ठल दाते
५९ ,, जनार्दन आत्माराम देसाई
६० कु. विमलाबाई देसाई
६१ रा. रा. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर
६२ सौ. शानाबाई सुंदरराव नवलकर
६३ डॉ. शिवशंकर विनायक ह. नवलकर
६४ सौ. सोनाबाई लक्ष्मण विठ्ठल नाडकर
६५ रा. रा. बाळाराम केरोबा नायक
६६ ,, नागेश्वरराम नायडू
६७ ,, विश्वनाथ लक्ष्मण नुलकर
६८ सौ. निराबाई पा. पवार
६९ श्रीयुत जिवाजी कृष्ण परुळकर
७० रा. रा. नारायण रामचंद्र पाटणकर
७१ ,, गोविंद नामाजी 'पाटील
७२ ,, पांडुरंग विठ्ठल पाटील
७३ ,, के. वाय्. प्रधान
७४ ,, जीं. व्ही. प्रधान
७५ सौ. छोटुबाई मोरेश्वर प्रधान
७६ ,, प्रभाकर गोविंद प्रधान
७७ शेट रतीलाल मोतीलाल पोंदा
७८ रा. रा. हरीलाल विश्राम पोंदा
७९ ,, आनंदराव माधवराव पौडवला
८० ,, के. व्ही. पंडीत
८१ ,, भिकाजी नारायण पंडित
८२ रा. रा. नारायण नरसिंह फडणीस
८३* ,, बापूराव राघोजी बोरावके ४
८४ ,, थोमेंद्र भधिया
८५ ,, व्ही. जी. भागवत
८६ ,, विनायक दाजी भावे
८७ ,, चिंतामण परशराम भिडे
८८ ,, मदनजी भिमजी
८९ ,, महादेव जिवाजी महाजन
९० ,, मनोहर बाळाराम मानकर
९१ कु. जमनाबाई बाळकृष्ण मालवणकर
९२ शेट माणेकशा लिमजीभाई मिस्त्री
९३ रा. रा. बाळकृष्ण जयराम मंत्री
९४ ,, धोंडु मनोहर रत्नपारखी
९५ शेट डी. एम्. राजा
९६ रा. रा. राचप्पा
९७ ,, वामन लक्ष्मण रुईकर
९८ ,, एम्. संभशिव रेड्डी.

( पृष्ठ ३२ खालील टीप पाहणें )

९९ रा. रा. साईप्रसाद लक्ष्मण रेड्डी
१०० ,, एच. व्ही. रंगराव
१०१ ,, एम. जी. रेगे
✓१०२ डॉ. लक्ष्मीप्रसाद गिरधरलाल ✓
✓१०३ शेट रुस्तमजी के. वरियाना ✓
१०४ रा. रा. जयराम पांडुरंग वाक्कर
१०५ ,, रघुनाथ हरी वाटवे
१०६ ,, विठ्ठल रखमाबाईमंदिर
१०७ ,, बी. ए. विश्वनायन
१०८ ,, के. वेंकोबाचारी
१०९ ,, निर वेंगडीया
११० ,, विनायक आप्पाजी वैद्य
१११ ,, व्यापारी वर्ग गुंतकल
११२ डॉ. हरी बाबूराव शिरसाटे
११३ रा. रा. व्यंकटेश के. शिवलकर
११४ रा. रा. हरी गोपाळ सकपाळ
११५ ,, चिंतामण रामचंद्र सातघरे
११६ ,, मोरेश्वर नारायण साबे
११७ ,, नागेश आत्माराम सावंत
११८ ,, बाळकृष्ण राघव सावंत (परडेकर)
११९ ,, वासुदेव सिताराम सावंत
१२० शेट फकीरउद्दीनसाहेब
१२१ रा. रा. बालकमगिरी स्वामी
✓ १२२ ,, जगन्नाथ सिंग
✓ १२३ मेजर दौलत सिंग
✓ १२४ रा. रा. नारायण सिंग
✓१२५ साराला व्यंकट सुभैय्या
✓१२६ शेट जगन्नाथ एम्. सेट
✓१२७ शेट मदनजी भिमजी सेट ✓
✓१२८ अबदुल हक्क
१२९ सौ. सिताबाई हरीने

---

टीपः—१ ज्यांच्या नांवाचे आधीं "ट्र" असें अक्षर आलें आहे. ते संस्थानचे ट्रस्टी आहेत असें समजावें. ते ट्रस्टी असल्यामुळें संस्थान कमिटीचे तहाहयात सभासद आहेत. अर्थात् त्यांचीं नांवें मतपत्रकांत घालण्याचें कारण उरलें नाहीं.

२ ज्यांच्या नांवाच्या मागें * अशी फुली आहे ते हल्लीं संस्थानकमिटीचे सभासद आहेत, आणि हल्लींच्या कमिटीबरोबर त्यांचीही मुदत पुरी होईल. अर्थात् ते फिरून निवडून येण्यास लायक आहेत.

३ ज्यांच्या नांवाच्यापुढें आंकडा आहे तो त्या सभासदांनीं शिर्डीसंस्थान कमिटीच्या ९ सभांपैकीं किती सभांस हजर होते हें दर्शवितो.

सुंदरराव दि. नवलकर,
ऑ. चिटणीस,
शिर्डी संस्थान कमिटी.

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें आगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धी द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंती अगर नापसंती कळविली जाईल. पसंती कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक **श्रीसाईलीला**

श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

अंक ११-१२, वर्ष ८ ] पौष-माघ [ शके १८५३

नलिनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



गमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| स्वप्नसृष्टि ... ... ... ... ... | १—६ |
| पत्रव्यवहार ... ... ... ... ... | ७-१४ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | १५-२२ |
| कै० काकासाहेब दीक्षित यांच्या मृत्युपत्राचा उतारा ... | २४-२६ |
| स्फुट विषय ( सूत्रें ६१ ते ७६ ) ... ... ... | ९२१-९३८ |
| गुरुप्रसाद अथवा विश्वामित्राचें अस्त्रदान ... ... | १—८ |
| अर्वाचीन भक्तलीलामृत ... ... ... ... | ३३-३५ |
| श्री संतकथामृत ( अध्याय ५७ वा )... ... ... | ३६-४४ |


## विनंति.


सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**


### श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

# स्वप्नसृष्टि

मंगळवार ता. ५ जानेवारी १९३२ रोजीं रात्रीं सुमारें साडेनऊ वाजतां लेखकाला रावसाहेब रामराव गणपतराव कमळाकर हे ( उमर सुमारें ६९ वर्षें ) मालाड मुक्कामीं एकाएकीं हृदयक्रिया बंद पडून निवर्तल्याची बातमी मिळाली. प्रेतयात्रा दुसऱ्या दिवशीं काढावयाची असें कै. रामरावांचे वडील बंधु श्रीयुत शामराव, जे लेखकाच्या घरानजिकच राहात आहेत, यांनीं ठरविल्यामुळें दुसऱ्या दिवशीं म्हणजे बुधवार ता. ७ रोजीं सकाळीं मालाड येथें लेखक गेला होता. प्रेतयात्रा सकाळीं आठ वाजतां निघून दहनक्रियेसाठीं कै. रामरावांचें शव नेण्यांत आलें. ज्या रस्त्यानें जाणें घडलें तो रस्ता पाहातांच लेखकाला अत्यंत विस्मय वाटला.

मालाड गांवांत सन १८९५ सालीं लेखक पहिल्यानें गेला होता. त्या वेळीं गांवठाणाच्या एका उंचवटयाच्या जागेची विक्री व्हावयाची होती. ती जागा विस्तीर्ण असून अगदीं स्वल्प किंमतींत म्हणजे सुमारें २००० रुपयांस ( दोन हजार रुपयांस ) खरेदी करण्यासाठीं लेखकाचा एक मित्र त्याला एकसारखा आग्रह करीत होता; पण त्या वेळीं त्या जागेसाठीं इतका पैसा केवळ जमिनींत घालणें इष्ट नाहीं असें वाटून लेखकानें त्याकडे दुर्लक्ष केलें. त्यानंतर १८९७ सालीं मुंबईंत एकएकीं प्लेगचा भयंकर प्रादुर्भाव होऊन त्या जागेची किंमत पन्नास हजार रुपये झाली आणि आजमितीस ती जागा दोन--अडीच लाख रुपयांच्या किमतीची आहे.

असो, त्या दिवशीं म्हणजे सन १८९५ सालीं मालाडच्या स्टेशनवर उतरून ती जागा पाहण्यास लेखक गेला होता, तीच त्याची, त्या जागेची व त्या रस्त्याची प्रथमची मुलाखत. त्यानंतर त्या रस्त्यानें लेखक मालाडला कधींही गेला नाहीं.

नाहींपेक्षां १९१० सालीं श्री दासगणूंचें मालाडला एका गृहस्थाच्या घरीं कीर्तन झालें होतें, त्या वेळीं लेखक कीर्तनाला गेला होता; परंतु कीर्तनाची

जागा मालाड गांवाच्या अलीकडच्या भागांत असल्यामुळें वरील वर्णन केलेल्या रस्त्यांतून त्याचें जाणें झालें नाहीं.

कै. रामराव हे मालाड येथें एका मित्राच्या घरीं राहात होते, हें ठाऊक होतें. त्यांच्या खबरीला सुमारें दोन वर्षांपूर्वी लेखक गेला होता. घर घोडबंदरच्या रस्त्यावर गांवाच्या अलीकडे म्हणजे दक्षिण बाजूला आहे. त्या वेळेस देखील वर वर्णन केलेला रस्ता पलीकडे म्हणजे उत्तरच्या बाजूस असल्यामुळें त्या रस्त्यानें जाणें झालें नाहीं इतकेंच नाहीं, परंतु त्या रस्त्याच्या अस्तित्वाविषयींचीही त्याला पूर्ण विस्मृति होती.

अशी वस्तुस्थिति आहे. गेल्या डिसेंबर महिन्याच्या तिसाव्या तारखेला पहांटेस लेखकाला स्वप्न पडलें कीं, तो मालाडच्या स्टेशनावर उतरून ज्या रस्त्यानें १८९५ सालीं गेला होता त्याच रस्त्यानें चालला होता. बरोबर कोणी मंडळी नव्हती; एकटाच होता. सध्यां स्मशान आहे त्याच्या दरवाज्या-पाशीं एक महादेवाचें देऊळ आहे. तें पूर्वी अत्यंत लहान रस्त्याच्या बाजूला, खेडेगांवीं असावें, अशा प्रकारचें होतें. स्मशानाच्या जागेभोंवतीं त्या वेळीं भिंती नव्हत्या; स्वप्नांत त्याला सध्यांचें देऊळ व स्मशानाच्या भिंती स्पष्ट दिसल्या. रस्ता तर पूर्ण ओळखीचा आणि हें देऊळ व या स्मशानाच्या भिंती कशा त्या पाहून त्याला त्या स्वप्नांत विस्मय वाटून तो जागा झाला.

कै. रामरावांच्या स्मशानयात्रेच्या वेळीं तो पांचसहा दिवसांपूर्वी स्वप्न-सृष्टींतील देखावा पाहून त्याला विस्मय वाटला.

प्रश्न आतां उद्भवतो कीं, लेखकाला पांचसहा दिवसांपूर्वी हें स्वप्न पडावें, त्या रस्त्यानें जाणें होईल याची भावी सूचना व्हावी, हें सर्व कसें ?

अशा प्रकारच्या स्वप्नसृष्टींत घडणाऱ्या गोष्टींचें विवेचन झाल्यास श्रींच्या पायापाशीं बसून घडलेल्या **कांहीं** चमत्कारांविषयीं उलगडा होण्याला कारणीभूत होतील.

याच हेतूनें हा लेख लिहिण्यांत येत आहे. प्रत्येक स्त्री-पुरुषाला अशा प्रकारचीं सूचनापूर्वक स्वप्नें पडतातच; परंतु त्यांचा व्हावा तसा उल्लेख होत नाहीं आणि त्याविषयीं विचार करण्यांत येत नाहीं.

पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या तत्त्वज्ञानांत स्वप्नसृष्टीविषयीं विचारपूर्वक अध्यात्मिक विवेचन दिसून येत नाहीं. तसेंच निद्रास्थितिविषयकही गहन विचार केलेला दिसत नाहीं.

जो कांहीं विचार त्यांच्या ग्रंथांत दिसून येतो तो जागृत स्थितींतल्या अनुभवांचा आहे. स्वप्न व निद्रास्थितिविषयीं अध्यात्मिक बाजूंनीं जो विचार आपल्या तत्त्वज्ञान्यांनीं व आत्मसाक्षात्कारी संतांनीं पूर्ण अनुभवाअंतीं केला आहे, आणि या सर्व स्थितींची जुळवाजुळव करून अध्यात्माची मजल तुर्या व समाधिस्थितिप्रत त्यांनीं नेली आहे, तशी विचारसरणी पाश्चात्यांच्या विवेचनांत मुळींच दिसून येत नाहीं.

या कारणांनीं अशा प्रकारचें स्वप्नसृष्टींतले घडलेले अनुभव श्रींच्या व इतर भक्तांनीं लिहून पाठविल्यास श्रीसाईलीलेंत ते जरूर प्रसिद्ध होऊन आधुनिक विद्वानांना वर लिहिल्याप्रमाणें आमच्या आत्मसाक्षात्कारी संतांच्या लेखांबद्दल व त्यांच्या चमत्कृतियुक्त लीलांबद्दल विचार करण्यास अनेक रीतीनें साधनीभूत होतील असें वाटतें, आणि श्री सांईबाबांच्या पायांपाशीं जे चमत्कारिक अनुभव दृष्टोत्पत्तीस आले त्यांतल्या **कांहींचा** अध्यात्मदृष्टया व पाश्चात्य विद्याप्रवीणांना पटेल असें विवेचन होणें शक्य आहे, असें लेखकाला वाटतें.

येथें पुनः पुन्हां अगदीं स्पष्ट रीतीनें कळविण्यास आनंद वाटतो कीं, श्री साईमाऊलीच्या पायांपाशीं व त्यानंतर अनेक अत्यंत आश्चर्यकारक असे अनुभव घडलेले आहेत व आजतागायत घडत आहेत. श्री साईलीलेचें अस्तित्व याचसाठीं आहे कीं, अशा प्रकारचे खात्रीपूर्वक अनुभव प्रसिद्ध होऊन, या केवळ भाकडकथा नाहींत. हे सर्व प्रकार काय आहेत व कसे घडतात या विषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊन, आत्मसाक्षात्कारी पुरुषांच्या साम-

त्यांची मजल कोठपर्यंत जाऊं शकते यांविषयींच्या विचारांना चालना उत्पन्न व्हावी. श्री साईबाबा हे कांहीं चमत्कारांचें दुकान घालून बसले नव्हते. चमत्कार दाखवून, थोतांड उत्पन्न करून, आपल्या जाळ्यांत गोंवून, आपल्या भक्तांकरवीं ऐहिकधनदौलत त्यांनीं गोळा केली नाहीं, इतकेंच नाहीं, पण "मी बाबाला दक्षिणा देतों" असा क्षुद्र विचार मनांत येणाऱ्या अनेक इसमांना-मग ते लक्षाधीश कां असेनात-अशांना ज्याच्या-त्याच्याजवळ पांच-पंधरा रुपयांची द्रव्ययाचना करावयाला लावून त्यांना जेरीस आणीत, हें सूक्ष्म दृष्टीनें पहाणारांस तेव्हांच कळत असे. तर मग हे चमत्कार कसे घडत व त्यांचा सहज समजेल असा उलगडा होऊं शकेल काय, याचा विचार व्हावा याच हेतूनें वरील स्वप्नसृष्टीच्या अनुभवाचा दाखला देऊन अशाच प्रकारचे खात्रीपूर्वक अनुभव प्रसिद्ध व्हावेत, ही नम्र विनंति करण्यांत येत आहे.

स्वप्नें अनेक प्रकारचीं पडतात. त्यांतलीं मुख्यत्वेंकरून अपचनामुळेंच असतात; परंतु कधीं कधीं अशीं आश्चर्यकारक स्वप्नें पडतात कीं, त्यामुळें मति गुंग होते. हें कां घडतें ? आपणा प्रत्येकामध्यें हें काय प्रचंड सामर्थ्य आहे कीं, ज्याची स्वल्पशी झुळुक अशा प्रकारच्या स्वप्नद्वारें कळावी व या गोष्टींचा योग्य खल झाल्यास श्री साईबाबांच्या पायांपाशीं, व त्यानंतर, जे अनेक आश्चर्यकारक अनुभव दृष्टोत्पत्तीस आले आहेत आणि जे भाकडकथा अथवा (mere imaginations) केवळ स्वकपोलकल्पित असे प्रकार नव्हत, अशा तऱ्हेची खातरी पाश्चत्य शास्त्रज्ञ प्रवीणांना होऊन त्यांतील कांहींचा उलगडा होण्याचा बराच संभव आहे, असें या अज्ञानी लेखकाला वाटतें.

याविषयीं अनुभवजन्य असे लेख आल्यास सर्व जिज्ञासु भक्तमंडळावर अत्यंत उपकार होतील.

वांद्रें,
ता. ११ जानेवारी १९३२

**रा. आ. तर्खड,**
संपादक.

**ता. क.** अशा प्रकारचे स्वप्नसृष्टींत पडलेले अनुभव पुण्याचे रा. रा. सहस्त्रबुद्धे यांनीं कळविलेलेले श्री साईलीलेंत प्रसिद्ध झाले आहेत, ते पहावे.

—**संपादक.**

**ता. क.**—वरील लेख लिहिल्यानंतर लेखकाच्या सुदैवानें श्री. चिंतामण विनायक वैद्य यांचा " हिंदुधर्माचीं तत्त्वें " हा अप्रतिम ग्रंथ हातांत आला. ग्रंथ अति उत्तम व प्रासादिक वाणीनें ओतप्रोत भरलेला आहे आणि तो सर्व आबालवृद्धांनीं व खास करून आधुनिक शास्त्रप्रवीण विद्वान व विदुषींनीं जरूर एकदा तरी अवलोकनांत घ्यावा, अशी लेखकाची त्यांना नम्र प्रार्थना आहे.

या ग्रंथांतील पान १५।१६ चा उतारा खालीं देत आहें. त्याविषयीं ग्रंथकर्ते लेखकाला क्षमा करतील, अशी आशा करितों.

" अशा प्रकारचें प्रत्यक्ष ईश्वराचें दर्शन होणारे साधुपुरुष लाखांत " एखादे आणि शेंकडों वर्षांतसुद्धां पाहावयास न मिळणारे हें खरें; कारण " इतकी निस्सीम भक्ति आणि असा सतत निदिध्यास फारच विरळा. पण " प्रत्येक मनुष्यास जागृतावस्थेंत नाहीं, पण स्वप्नांत आपल्या आत्म्याचें कांहीं " तरी ईश्वराशीं संबंध असलेलें ज्ञान अनुभवास येतें ही गोष्ट निर्विवाद आहे. " स्वप्नाचा विचार करणाऱ्यांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, जें स्वप्न पहां- " टेच्या सुमारास प्रत्यक्ष आपल्यास विलक्षण रीतीचें, मनांत नसलेलें ( ध्यानीं " असे तें स्वप्नीं दिसे ) दिसतें तें व्यवहारांत लागलीच सिद्ध होतें. अशा " प्रकारचें स्वप्न पुष्कळांस सांगतां येईल. असें स्वप्न बहुधा ज्या वेळेस मन शांत, " ईश्वरविषयक विचारानें भरलेलें, अथवा पुण्य ग्रंथाच्या वाचनानें " निर्विकल्प होऊन मनुष्य झोंपीं जातो तेव्हां पडतें. याचा अनुभव मला " अनेक वेळां आला आहे. जास्त न सांगतां माझ्या अनुभवाचें मी एक " स्वप्न सांगतों. सितारामपंत दामले हे ज्या पहांटेस वारले त्या पहांटेस आणि " त्याच वेळेस मला असें स्वप्न पडलें कीं, ' एक प्रेतयात्रा चालली आहे, " तेव्हां त्याच्याबरोबरच्या लोकांपैकीं एकानें मला सांगितलें कीं, ते गृहस्थ

" नुकतेच गेले.' याच वेळेस वासुदेवराव जोशी, चित्रशाळेचे मालक, यांनीं
" मला बाहेरून हांक मारून म्हटलें, 'अहो उठा ! सितारामपंत गेले !' हें
" ऐकून मला खरोखरच आश्चर्य वाटलें. अशा प्रकारचीं स्वप्नें मला दोन
" तीन सांगतां येतील, आणि कित्येक गृहस्थांस अशा प्रकारचा अनुभव
" आलेला असेल. स्वप्नांत जीवात्म्याला होणारी गोष्ट कशी कळते, हें एक
" मोठें गूढ आहे. तें कधीं कधीं कळतें यांत तर संशयच नाहीं. याचा
" निर्णय ईश्वराचें अस्तित्व मानल्याशिवाय लागावयाचा नाहीं. माझ्या दृष्टीनें
" हें एक प्रत्यक्ष प्रमाण आहे, आणि एक क्षणभर कां होईना, या स्वप्नानु-
" भवांत ईश्वराची आपल्यास साक्ष पटणारी आहे. अर्थात या प्रमाणाला
" 'अग्निरुष्णाः' अशा स्वरूपाचा अनुभव हा प्रत्यक्ष पुरावा मानतां येतो. "

# पत्रव्यवहार

## ॐ नमः शिवाय

पार्ये, पो. वसई.

कृ. सा. न. वि. वि. कांहीं महिन्यांपूर्वी मी आपणांस एक पत्र पाठविलें होतें, त्याचें उत्तर मिळालें नाहीं; म्हणून मुद्दाम हें पत्र लिहीत आहें. तरी कृपा करून या पत्राचें उत्तर पाठवावें.

१. श्री साईबाबांनीं समाधीपूर्वीं " मी आतां बच्चा होऊन येतों" असें सांगितलें होतें. तरी ते बच्चा होऊन आल्याचें आपणांस माहीत आहे काय ? " साईबाबा " या देहांत त्यांना भेटण्याचें भाग्य माझ्या नशीबीं नव्हतें, परंतु त्या पवित्र व अधिकारी आत्म्याची भेट मला नवीन देहांत तरी होईल काय ? अथवा त्यांच्याइतकाच अधिकारी सत्पुरुष विद्यमान असलेला आपणांस माहीत आहे काय ?

२. केडगांवच्या नारायणमहाराजांबद्दल आपणांस काय माहिती आहे ? दिपवाळींत मी त्यांचेकडे गेलों होतों. त्यांचा मार्ग व साईबाबांचा मार्ग यांत बरेंच अंतर दिसलें.

श्री. शंकरराव गवाणकर यांनीं श्री साईबाबांबद्दलचे अनुभव मला सांगितले, ते फारच महत्त्वाचे आहेत. म्हणून आपणांकडे प्रसिद्धीकरितां पाठवीत आहें. ( हे अनुभव दुसरीकडे प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. )

आपला,

**वासुदेव लक्ष्मण गवाणकर.**

उत्तरः—

१ श्री साईबाबा " बच्चा होऊन येणार " ही गोष्ट कर्णोपकर्णी लेखकाच्या ऐकिवांत आहे. याविषयीं खात्रीपूर्वक अनुभव कोणी साईभक्तांनीं पाठविल्यास तो आनंदानें प्रसिद्ध करण्यांत येईल.

श्री साईमाऊलीनें लेखकाचें पोट यथासांग भरल्यामुळें, इतर साधुपुरुषांकडे धांव घेण्याचें लेखकाला प्रयोजन वाटलें नाही. अशा अद्वितीय

रत्नाच्या चरणधुळीचें वंदन झाल्यामुळें त्यांचीच प्रतिमा लेखकाच्या मनः-चक्षूपुढें आहे. म्हणून जरी त्यांनीं इतर देह धारण केला असेल—आणि तसें करणें त्यांना मुळींच अशक्य नाहीं. तरी तो कोणता देह आहे, हें धुंडण्याची त्याला आवश्यकता वाटत नाहीं. त्या नवीन देहधारिणाला योग्य वाटल्यास आपली साक्ष ते जरूर पटवून देतील याविषयीं लेखकाला संशय नाहीं.

तसेंच " मी तेथें तुझ्यापाशीं नाहीं काय ? " हें वाक्य लेखकासोबत इतरांना श्री. साईमाउली बोलून गेली आहे; तेव्हां त्यांना बाहेर न पाहतां आपल्यापाशींच शोधून काढलें पाहिजे. सर्व संतांचीं वाक्यें याचप्रमाणें शिकवीत नाहींत काय ? गोष्ट वाटते तितकी कठीण नाहीं, तशीच सोपी पण नाहीं. केवळ प्रेमाचीच गोष्ट आहे. बाबांच्या " निष्ठा आणि सबूरी " या शब्दांवर भार ठेविला पाहिजे.

अशा प्रकारची निष्ठा असल्यावर तशा प्रेमयुक्त व्यक्तीला दर्शन देण्याची फरज बाबांना इष्ट रूपानें देतां येते इतकें मात्र आश्वासन देण्याचें धाडस लेखक करीत आहे.

१. केडगांवच्या श्री. नारायणमहाराजांचें दर्शन लेखकाला इ. स. १९११ सालीं त्यांच्या फ्रेंच पुलाजवळच्या श्री. काका महाजनींच्या सोबत श्री. अंजनीबाईच्या घरीं झालें होतें, आणि त्यानंतर आगगाडींत दोनतीन वेळां झालें होतें.

महाराज अधिकारी पुरुष आहेत असें लेखकाला वाटतें. लेखक बुध्यां केडगांवास कधींही गेला नाहीं. त्यांच्या व साईबाबांच्या मार्गामध्यें काय फरक आहे हें त्याला माहीत नाहीं, आणि त्याविषयींची चिकित्सा करण्याचें त्याला कधींही प्रयोजन पडलें नाहीं.

श्री. गवाणकरांच्या पहिल्या पत्राचें उत्तर पाठविण्यास लेखकाकडून विलंब झाला त्याबद्दल त्याला वाईट वाटत आहे. मुख्य कारण हेंच कीं, आपण एक अज्ञानी अननुभवी व अनधिकारी असल्याची त्याला पूर्ण जाणीव आहे. तेव्हां अशा गहन विषयाचें उत्तर कसें द्यावें, हें त्याला कळेना.

हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. श्री साईंबाबांच्या देहाचें दर्शन न झालेले शेंकडों बालगोपाल आज हयात आहेत. त्यांच्या मनांत वरील प्रकारच्या प्रश्नमालिका रात्रंदिवस घोळत असल्याच पाहिजेत. श्री. गवाणकरांनीं हे प्रश्न विचारून लेखकावर अत्यंत उपकार केले आहेत.

श्री साईंबाबांचें प्रत्यक्ष दर्शन होईपर्यंत त्याच्या १६ व्या वर्षापासून ४५ साव्या वर्षापर्यंत (ज्या वर्षी श्रींचे पाय प्रथम दिसले) लेखकाच्या मनाची जी स्थिति होती त्याची त्याला पूर्ण जाणीव आहे, म्हणून यथाशक्ति यथामति उत्तर देण्याचें तो धाडस करीत आहे; तरी सूज्ञ वाचकांनीं त्याच्या अज्ञानाची कींव घेऊन त्याला क्षमा करावी.

बांद्रे-८-१-१९३२ रा. आ. तर्खड

## श्री साईंबाबांच्या हातची उदी

श्रीयुत विठ्ठल लक्ष्मण सुबंध यांच्याकडून ता. २६-१२-३१ चें कृपायुक्त पोस्टकार्ड आलें त्यांतील उतारा:—"आपण अत्यंत कृपावंत होऊन सद्गुरु श्री साईंबाबा महाराजांच्या हातची उदी मला पाठविली त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी व ऋणी आहें. उदीसारखी देणगी (व तीही "बाबांच्या" हातच्या उदीची) ही सर्व देणग्यांत पूज्य व श्रेष्ठ असून ती अतुलनीय आहे. तिची सर दुसऱ्या कोणत्याही देणगीस येणार नाहीं. याप्रमाणें प्रेमभावानें व भक्तिपूर्वक अंतःकरणानें श्री. सुबंध यांनीं जे उद्गार दर्शविलेले आहेत त्यामुळें ज्या "हातच्या उदी" विषयीं अद्यापपर्यंत लेखकानें लिहावयाचें लांबणीवर टाकलें होतें त्या "हातच्या उदी" विषयींचा खुलासा:—

सन १९१० सालच्या सेप्टेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेला लेखकाला श्री साईमाऊलीचें प्रथम दर्शन झालें. त्या वेळीं सोबत मित्रमंडळी पुष्कळ होती.

श्री साईमाऊलीनें प्रथम भेटीलाच जी अवर्णनीय खूण दिली आणि ज्याविषयींचा खुलासा झाला आहे त्यावरून श्रींच्या ठायीं त्याची निष्ठा जडली.

श्रींच्या दर्शनास देऊळरूपि मशिदींत दिवसांतून तीनचार वेळां खेपा होत असतच. त्या त्या वेळीं कधीं अल्प वेळांत कधीं बऱ्याच वेळानें

"जा ! उदी घ्या आणि वाडयांत जाऊन बसा !" याप्रमाणें आज्ञा व्हावयाचीच. कधीं कधीं स्वतः उठून धुणीमाईतून आपल्या स्वतःच्या हातानें उदी घेऊन ती सेवकाला व इतरांना मिळावी; कधीं कधीं पुष्कळ समुदाय असल्यास धुणीजवळ उभें राहून ज्यानें त्यानें त्या धुणिमाईमधून थोडी उदी आणून श्री साईमाउलीच्या हातांत द्यावी व त्या परमप्रिय व पूज्य माउलीनें आपल्या उजव्या हाताच्या आंगठयानें हमेशा त्या त्या भक्ताच्या भृकुटीच्या मध्यभागीं किंचित दाबून आणि बाकीच्या चार बोटांनीं त्या भक्ताच्या उघडया माथ्यावर त्या उदीच्या खुणा उमटाव्या असा हमेशाचा प्रकार असे.

स्त्रियांच्या डोक्यावर त्यांच्या काळ्या केशामुळें त्या खुणा ठळक दिसाव्या.[1] कधीं कधीं कोणी तरी श्री साईमाउलीला श्रम न पडावे म्हणून पसा पसाभर उदी घेऊन श्रींच्यासमोर जरा बाजूस उभें रहावें, आणि त्याच्या हातांतून थोडी उदी घेऊन समोर उभ्या राहाणाऱ्या भक्ताच्या भालप्रदेशीं श्रींनीं स्वहस्तांनीं वर सांगितल्याप्रमाणें उदी लावावी, आणि नंतर त्याच्या हातांत थोडी उदी द्यावी. ती उदी मिळाल्यानंतर प्रत्येक भक्त श्रींच्या पायां पडून त्यांची रजा घेऊन "वाडयांत" जाऊन बसत असे.

हा प्रकार श्रींचें दर्शन झालेल्या हजारों स्त्री-पुरुषांच्या अनुभवांत आला आहे; परंतु ज्याना श्री साईमाउलीचें प्रत्यक्ष दर्शन झालें नाहीं, अशी जी जिज्ञासु भाविक मंडळी आहे त्यांच्यासाठींच हा लेख इतक्या विस्तारानें लिहिण्यांत येत आहे.

असो. या प्रमाणें प्रत्येक वेळीं थोडी उदी मिळवून जे पांच दिवस श्रींच्या पायांजवळ जात असत त्यावेळीं मिळवलेली उदी जपून मुंबईस आणण्यांत येत होती.

सन १९१० सालीं पहिल्यानें सप्टेंबर, व नंतर डिसेंबर अशा दोन वेळीं श्रींचें दर्शन श्रीशिरडीस झालें होतें. तिसऱ्या खेपेस सन १९११ च्या

१ लेखकाच्या बायकोच्या एका घोर दुखण्यांत वांद्रें येथें त्याच्या राहात्या घरीं बाबांच्या उदीच्या अशा खुणा एकाएकीं उठलेल्या आमच्या दृष्टोत्पत्तीस आल्या आहेत आणि असें झाल्यानंतर तिच्या दुखण्यास उतार पडून ती बरी झाली आहे. त्या वेळीं तिला बाबा प्रत्यक्ष उदी लावतांना दिसले. आम्हांला मात्र त्या वेळेस दिसले नाहींत.